पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक – २१५**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २४/०३/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **२४/०३/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा,निकम, मा.भालकर, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.शिंदे, मा.आगळे, मा.देशमुख – सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा,गलबले, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.मोरे, मा,पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा,सेठिया, मा.वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.देशमुख, मा.पानसरे, मा,तावडे – प्रशासन अधिकारी तथा

प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.जरांडे – मुख्य सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – सहा. आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML, मा.डॉ.चेतना केरूरे – सह व्यवस्थापकिय संचालक PMPML हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३८) ग प्रभागाअंतर्गत कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे करीता विद्युत व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे करीता वाढीव कर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.३९) कोरोना विषाणू (कोविड-१९) कालावधीत कामकाज केलेल्या मयत कामगार यांचे वारसास मंजूर धोरणानुसार सुरक्षा कवच योजनेचा लाभ देणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.४०) कोरोना (कोविड-१९) रूग्णांवर वैद्यकिय उपचार करणेकामी आवश्यक असणारे Inj. Remdesivir 100 Mg थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत.

विषय क्र.४१) वाहतुक व्यवस्थापक पदावर नेमणूकीबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) ब क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाकरिता अतिरिक्त हायड्रोलिक वाहन उपवब्ध करणेकामी आवश्यक मे.आवटे फेब्रिकेटर्स अन्ड ऑटोमोबाईल वर्क्स यांचेकडून अतिरिक्त खर्च र.रू.२५ लाख इतक्या खर्चाला मान्यता मिळणेबाबत. – मा.सुरेश भोईर, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) प्रभाग क्र.१४, २२ व ३० मध्ये सुरक्षा रक्षकाची नेमणूक करणेबाबत. – मा.सुवर्णा बुर्डे, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) सुरक्षा रक्षक नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) प्रभाग क्र.३२ मधे सारथी वेब वरील तक्रारी निवारणा करीता स्थापत्य विषयक कामे करणे (निविदा नोटिस१/५६/४३/२०१९-२०२०) यां कामाचे स्वरूप बदल करणेबाबत. – मा.सुरेश भोईर, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) प्रभाग क्र.३१ येथील कामाचे स्थळ बदलाबाबत. – मा.शत्रुघ्न काटे, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२०९ दि.१८/०२/२०२१ व दि.२४/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१४ दि.१७/०३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ९०३८ विषय क्रमांक – १

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/१३३/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) नुसार Covid-19 या विषाणूचा प्रादुर्भाव लक्षता घेता, अत्यावश्यक बाब म्हणून मे.स्पर्श हॉस्पिटल संचालित ऑटो क्लस्टर येथे अतिदक्षता विभागातील(ICU) ५० बेडस् व १५० ऑक्सिजन युक्त बेडसचे DCH Expression of Interest(EOI) मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यान्वित करुन EOI व्यतिरीक्त सुपर स्पेशालिटी डॉक्टर व रुग्णालयांच्या कामाकरीता सध्याचा कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता तसेच रुग्ण सेवेत अडथळा निर्माण होवू नये म्हणून अतिरीक्त नेमलेल्या CSSD-3, Pharmacist-2, Store-1, O2 Bank-2, Physiotherapist-1, Cardiologist-1, Nephrologist-1, Gynecologist -1, Phychiatrist-1 व Security-15 प्रमाणे दिनांक १८/०९/२०२० पासून पुढील दिनांक १८/०३/२०२१ या पाच महिने कालावधीमध्ये ऑटो क्लस्टर येथे अतिदक्षता विभागातील(ICU) ५० बेडस् व १५० ऑक्सिजन युक्त बेडसचे DCH सुरु असेपर्यंत सुपर स्पेशालिटी डॉक्टर व रुग्णालयांच्या कामाकरीता आवश्यक लागणारे मनुष्यबळ मा.महिला वैदयकीय अधिकारी व मा.अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी टिपणी पान क्र.५३ व मा.आयुक्त साहेब यांचेकडील दि.२५/०१/२०२१ रोजी मान्य केलेल्या प्रस्तावास अधिन राहून तसेच मे.स्पर्श हॉस्पिटल यांनी मनपाने मान्य केलेले र.रू.१३,२०,५००/- मान्य असलेचे कळविलेनुसार अतिरिक्त मनुष्यबळाकरीता नमुद वेतन दरानुसार थेट पध्दतीने प्रति महा र.रु.१३,२०,५००/- प्रमाणे दि.२७/०२/२०२१ या कालावधीकरीता (दि.१८/०९/२०२० पासून दि.२७/०२/२०२१ या कालावधीकरीता) अंदाजे र.रु.७०,७६,०००/- अदा करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेकामी व सदर खर्चास मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेची मा.अति.आयुक्त(२) यांनी मागणी असली तरी, सदर विषयातील कामासाठी र.रू.७०,७६,०००/- (अक्षरी र.रू.सत्तर लाख शहात्तर हजार फक्त) इतकी रक्कम अदा करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०३९ विषय क्रमांक – २

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – आकाशचिन्ह व परवाना

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आप/७/कावि/६७/२०२१, दि.१६/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडुन मनपा परिसरातील विद्युत खांबावरील २x३ फुट या आकाराचे (kiosk) जाहिरात फलकाचे हक्क देणेबाबत ई-निविदा सुचना क्र.२/१ ते ८८/२०१८-१९ प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार विषयांकीत कामी एकुण 35 जागेंसाठी ६ ठेकेदारांनी अधिकतम दर (परिशिष्ट-ड नुसार) दिलेले आहेत. सदरचे प्राप्त अधिकतम दरानुसार काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील

अटीशर्तीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४० विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३६४/२०२१, दि.०४/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/35/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी मध्ये ठिकठिकाणी कलर पेव्हींग ब्लॉक व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.रुषीकेष ज्ञानदेव घोडेकर नि.र.रू.29,99,711/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्यान्नव हजार सातशे अकरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,46,911/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,46,911/- पेक्षा 25.50% कमी म्हणजेच र.रु.21,95,449/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,413/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.52,800/- = एकुण र.रु.22,49,662/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४१ विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३६५/२०२१, दि.०४/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/92/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर परिसरातील मुख्य रस्त्यांचे व इतर अंतर्गत रस्त्यांचे अद्ययावत पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रू.43,66,497/- (अक्षरी र.रु.त्रेचाळीस लाख सहासष्ठ हजार चारशे सत्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.42,92,747/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.42,92,747/- पेक्षा 33.19% कमी म्हणजेच र.रु.28,67,984/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.25,653/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.29,67,387/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट

दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४२ विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/३९३/२०२१, दि.०५/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.15/29/2020-21 अन्वये इ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.5 मधील ड्रेनेज लाईन व चेंबर्सची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.भोलेशंकर एंटरप्रायजेस नि.र.रू.37,48,076/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख अठ्ठेचाळीस हजार शहात्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,48,076/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,48,076/- पेक्षा 20.2% कमी म्हणजेच र.रु.29,90,965/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20,216/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.30,11,181/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४३ विषय क्रमांक – ६

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/७३२/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.46/47/2020-21 अन्वये सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मधील किवळे गावठाण व किवळे भागातील रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,45,320/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख पंचेचाळीस हजार तीनशे वीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,70,970/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,70,970/- पेक्षा 32.70% कमी म्हणजेच र.रु.27,39,763/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,078/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.74,350/- = एकुण र.रु.28,17,191/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट

दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४४ विषय क्रमांक – ७

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षे/भूजि/५/कावि/६३/२०२१, दि.०२/०३/२०२१

विषय – पिंपरी येथील स.न.२१०, सि.स.नं.४८०१, क्रोमा बिल्डींग शेजारील मनपा वाहनतळ जागा ११ महिन्यांनकरीता देणेबाबत.

विषय क्र.७ चा विचार दि.०७/०४/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४५ विषय क्रमांक – ८

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९२/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/50/47/2020-21 अन्वये प्र.क्र.२१ मधील नव्याने ताब्यात आलेले रस्ते एम.पी.एम. पध्दतीने विकसीत करणेकामी मे.परमानंद ए क्रीपलानी नि.र.रू.39,98,627/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस लाख अठ्ठयान्नव हजार सहाशे सत्तावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.39,56,827/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.39,56,827/- पेक्षा 27.18% कमी म्हणजेच र.रु.28,81,361/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,26,923/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.41,800/- = एकुण र.रु.30,50,084/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४६ विषय क्रमांक – ९

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९६/२०२१, दि.०८/०३/२०२१

विषय - प्र.क्र.२३ संदीपनगर, कैलासनगर, गुरुनानक नगर इ.परिसरात स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४७ विषय क्रमांक – १०

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९५/२०२१, दि.०८/०३/२०२१

विषय - प्र.क्र.२३ मधील विविध ठिकाणी कलर पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४८ विषय क्रमांक – ११

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९४/२०२१, दि.०८/०३/२०२१

विषय - प्र.क्र.२७ येथे विविध भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०४९ विषय क्रमांक – १२

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९३/२०२१, दि.०८/०३/२०२१

विषय - प्र.क्र.२३ मध्ये पवारनगर, पडवळनगर, ड्रायव्हर कॉलनी, विघ्नहर्ता कॉलनी व इतर भागात नविन कलर पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५० विषय क्रमांक – १३

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/४/कावि/१४५/२०२१, दि.१०/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १०६२, दिनांक २०/०१/२०११ अन्वये दिव्यांग विकासाच्या योजना क्र.१३ अन्वये सुरू करण्यास तसेच

विद्यार्थ्यांबरोबरच शहरातील ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या पिंपरी चिंचवड शहरातील सर्व ठिकाणच्या दिव्यांग, कर्णबधीर व १००% अंध नागरिकांना पी.एम.पी.एम.एल. चा मोफत पास सर्व ठिकाणाचा देण्यास मान्यता देणेत आलेली आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये जाहीर प्रकटनाद्वारे उपरोक्त विषयांकित अर्ज मागविणेत आले होते. त्यानुसार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता जावक क्र.पी. एम.पी.एम.एल./पास वि./५१३५, दिनांक २५/०२/२०२१ पत्रान्वये एकूण २४०४ पासेस वितरीत करण्यात आलेचे कळविले आहे. त्यानुसार सदर पासेसची एकूण रु.रु.२,२०,७१,७०७/-(अक्षरी र.रु.दोन कोटी वीस लाख एक्काहत्तर हजार सातशे सात फक्त) इतकी रक्कम मिळणेबाबत पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी विनंती केलेली असून सदरची रक्कम त्यांना अदा करणे आवश्यक आहे. सबब, सदर संस्थेस मागणीनुसार र.रु.२,२०,७१,७०७/-(अक्षरी र.रु.दोन कोटी वीस लाख एक्काहत्तर हजार सातशे सात फक्त) च्या खर्चास व सदरचा खर्च दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत "महापालिका हद्दीतील अंध, निःसमर्थ (अपंग), कर्णबधीर, मतिमंद व्यक्तींना PMPML चे पासेस मोफत देणेबाबत" या उपलेखाशिर्षावरून खर्ची करणेस मान्यता देणेकामी तसेच एच.आय.व्ही./ एड्स बाधीत व्यक्तींना पी.एम.पी.एम.एल. चे मोफत बसपासचा खर्च इतर कल्याणकारी योजनेतून करणेत येवून इतर कल्याणकारी योजने अंतर्गत मनपा हद्दीतील HIV/AIDS बाधीत व्यक्तींना PMPML चे मोफत बसपास देणे या उपलेखाशिर्षावरील तरतुदीतून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पूर्व पीसीएमटी व पुर्व पीएमटी या दोन संस्थांची मिळून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ही कंपनी २००७ मध्ये स्थापन करणेत आली तेव्हापासून दरमहा संचलन तूट पीएमपीएमएल ला देणेत येते परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मा.सभासद, प्रवासी नागरीक यांच्या समस्या/अडचणी सोडविण्यासाठी परिवहन महामंडळाकडील जबाबदार व सक्षम अधिकारी उपलब्ध होत नाही लोखंडे सभागृह पिंपरी येथे पीएमपीएमएल चे कार्यालय आहे परंतु तेथे लेखनिक दर्जाचे कर्मचारी आहेत तसेच श्री.माने हे अधिकारी असून त्यांना निर्णय घेणेचे कोणतेही अधिकार नाहीत यास्तव पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बसेस, बस मार्ग, नविन बस मार्ग, बस स्टॉप इ. बाबत मा.सभासद यांच्या मागण्या असतात. याकामी पीएमपीएमएल कडील सह व्यवस्थापकीय संचालक यांनी आठवड्यातून ३ दिवस म्हणजे सोमवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी लोखंडे सभागृह येथे उपस्थित रहाणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच पीएमपीएम कडील सह व्यवस्थापकीय संचालक यांनी मा.स्थायी समिती, मा.मुख्य सभेस उपस्थित राहून माहिती देणे आवश्यक आहे याबाबतची पुर्तता न झालेस पीएमपीएमएल ला कोणताही निधी देणेत येवू नये या उपसुचनेसह मुळ विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५१ विषय क्रमांक – १४

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१७/कावि/४६०/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाचे कोवीड १९ च्या कामाकाजातील सेवेमध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून तसेच कोवीड १९ संसर्गामुळे वाढत असलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे पार्श्वभूमीवर वैदयकिय अधिकारी व पॅरामेडीकल कर्मचारी यांची आवश्यकता आहे. महापालिकेच्या सर्व रुग्णालय प्रमुखांच्या व वाय.सी.एम.एच. (कुंटुब कल्याण) विभागाच्या मागणीनुसार यापुर्वी कोरोना १९ चे महामारीच्या काळात दि.३१/०१/२०२१ अखेर मानधन सेवेत काम केलेल्या वैदयकिय अधिकारी व पॅरामेडीकल कर्मचारी तसेच वर्ग ४ कर्मचारी यांचेमधून प्रथम जे उमेदवार महापालिकेमध्ये रुजु झालेल्या दिनांकानुसार प्राधान्याने विचार करुन आवश्यकते प्रमाणे पुढील दोन महिने कालावधीसाठी पुर्णता हंगामी स्वरुपात नियुक्ती देणेस व रुजू न झाल्यामुळे रिक्त राहिलेली पदे पुढील उमेदवारांमधून भरणेस, भविष्यात कोविड–१९ चा प्रदुर्भाव वाढून रुग्णाच्या संखेत वाढ होवू शकते हि बाब विचारात घेता आणखी वाढीव पदांची आवश्यकता भासल्यास वाढीव पदे भरणेस तसेच त्यांना द्यावयाचे मानधनाचे अदायगी करिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५२ विषय क्रमांक – १५
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – मध्य.सा.भांडार, वैद्यकिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३०१/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी Antigen Test kits खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने M/s.Sudarshan Pharma Industries Ltd., Mumbai यांनी OSKIT SARS COV2 Corona Antigen Test (B.No.CAG-D056) २,००० किटस् (५०,००० टेस्ट 25 Test per Kit Rate per Test Rs.79/- अधिक 12% GST Rs.9.48 प्रमाणे प्रति टेस्ट र.रु.88.48 या दराने खरेदी करण्यास व (निविदा र.रु.१,७५,००,०००/- पेक्षा ७७.४२% कमी दराने) येणा-या र.रु.४४,२४,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५३ विषय क्रमांक – १६
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – कामगार कल्याण
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त(३) यांचे पत्र क्र.काक/१/कावि/१०१/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागाचे स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर सन २०२०-२१ मुळ अंदाजपत्रकासाठी र.रु.९०,००,०००/- इतकी अंदाजपत्रकीय तरतुद

करणेत आली आहे. मा.आयुक्त सो.यांचे कडील आदेश क्र. प्रशा/२/कावि/७००/२०२० दि.१८/१२/२०२० अन्वये मा. इंदलकर चंद्रकांत पोपट उप आयुक्त यांची आस्थापना कामगार कल्याण विभागाकडे आली आहे. तसेच आदेश क्र.प्रशा/०३/कावि/१/२०२१ दिनांक ०१/०१/२०२१ अन्वये श्री.व्यंकट पाटील, वाहन चालक यांची कामगार कल्याण विभाकडे बदली द्वारे नेमणुक झाली आहे. सदरील लेखाशिर्षावर दिनांक २/३/२०२१ अखेर र.रु.७७,२९,११७/- इतका खर्च झाला असुन र.रु.३,५७,१५८/- इतकी तरतुद शिल्लक आहे. त्यामुळे स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर वाढीव तरतुद करणे अपेक्षित आहे.माहे फेब्रुवारी २०२१ चे मासिक वेतनास तरतुद अपुरी पडणार आहे. त्यामुळे सन २०२०-२१ करिता स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर दावे व खटले या संबधी लेखाशिर्षामधुन खालील प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | अंदाजपत्रक पान क्र/अ.क्र | अंदाजपत्रकीय तरतुद | वाढ र.रु | घट र.रु | एकुण आवश्यक तरतुद सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावे खटले या संबधी खर्च | १९८/(२२०)४ | २५,००,०००/- | ० | ४,५०,०००/- | २०,५०,०००/- |
| २ | स्थायी आस्थापना | १९८/४ | ८०,८६,२७५/- | ४,५०,०००/- | ० | ८५,३६,२७५/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५४ विषय क्रमांक – १७

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/कावि/३०२/२०२१, दि.१०/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ड/ग मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 32) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५५ विषय क्रमांक – १८

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/१२५/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ह क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 4) नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५६ विषय क्रमांक – १९
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/१७९/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 2) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५७ विषय क्रमांक – २०
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.बक्षे/लेखा/५/कावि/१४८/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विदयुत विभाग ब क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे अटीस अधिन राहून संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५८ विषय क्रमांक – २१
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/कावि/२८३/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ मुख्यालयाकडील निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ' अ' मधील (१ ते ५) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०५९ विषय क्रमांक – २२
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.बक्षेका/५-अ/कावि/२२२/२०२१, दि.१६/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा

कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (१ ते ६) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६० विषय क्रमांक – २३

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय विद्युत

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/६५/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

औंध रावेत रस्त्यावरील औंध हॉस्पीटल येथील ठिकाणी मनपामार्फत BRTS रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी अति उच्चदाब(132 KV) विजवाहिनीचा टॉवर अडथळा करीत आहे. सदरच्या टॉवरमुळे अपघात होऊन नागरिकांचे जिवितांस अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरची अति उच्चदाब विज वाहिनी टॉवर त्वरीत हलविणे अत्यावश्यक आहे. याकरीता महापारेषण कंपनीने उपरोक्त सदर कामाचे अंदाजपत्रक SE/EHV/O&M/Circle/PN/1100 दि.5-10-2020 अन्वये मंजुर केलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे सुपरव्हिजन चार्जेस र.रू.31,60,726/- (जीएसटी सह) महापारेषण कंपनी यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६१ विषय क्रमांक – २४

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – मध्य.सा.भांडार, वैद्यकिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३०२/२०२१, दि.१५/०३/२०२१

विषय – मनपाने ठरवून दिलेल्या रूग्णालयातून RTPCR Test ची तपासणी करणेबाबत.

विषय क्र.२४ मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६२ विषय क्रमांक – २५

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/३४७/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३९/२१-२०२०-२१ थेरगाव प्र.क्र.५० मध्ये प्रसुनधाम शेजारी 18 मी.डी.पी. रस्त्यास थेरगाव चिंचवड पूल बांधणे अंतर्गत विद्युत विषयक कामे करणेकामी मे.न्यु सोलर इलेक्ट्रिकल्स & इलेक्ट्रॉन्स नि.र.रू.६२,२७,९८९/- (अक्षरी र.रू.बासष्ट लाख सत्तावीस हजार नऊशे एकोणनव्वद फक्त) पेक्षा २४.७५% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील

वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. सबब, प्राप्त निविदांपैकी मे.न्यु सोलर इलेक्ट्रिकल्स & इलेक्ट्रॉन्स या ठेकेदाराची निविदा, निविदा रकमेच्या २४.७५% कमी, ही सर्वात कमी दराची असल्याने स्विकृती करणेबाबत मा.अति.आयुक्त(१) यांनी दि.१३/३/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.न्यु सोलर इलेक्ट्रिकल्स & इलेक्ट्रॉन्स यांचेकडून वरील कामाचा करारनामा करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६३ विषय क्रमांक – २६

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/३४४/२०२१, दि.१५/०३/२०२१

विषय - प्र.क्र.८ से.क्र.४ मोकळी जागा क्र.४ येथे विरंगुळा केंद्र व उद्यान उभारणेबाबत.

विषय क्र.२६ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६४ विषय क्रमांक – २७

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/३३५/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 9) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६५ विषय क्रमांक – २८

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/८४/२०२१, दि.१५/०३/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 6) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६६ विषय क्रमांक – २९
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – उद्यान स्थापत्य
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/१८६/२०२१, दि.१६/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.१८ मधील पार्वती उद्यान, सिल्व्हर ओक, मोरया उद्यान व इतर उद्यानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.२९ चा विचार दि.०७/०४/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६७ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/३२९/२०२१, दि.१६/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोवीड-१९ चा संसर्गजन्य रोगामुळे महापालिका परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असल्याने "कोरोना" आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, त्याचा मुकाबला करण्याकरिता तातडीने Inj.Remdesivir 100mg आवश्यक आहे. भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व महापालिका अधिनियम कलम 63(6) मधील प्रयोजनासाठी कोवीड-१९ संसर्गजंन्य रोगावरील उपचारासाठी Inj. Remdesivir 100mg खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र. 42/2020-21 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.लक्ष्मी मेडीकल यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.1051.680 प्रती Vials (सर्व करासहित) स्विकृत करण्यात आलेला होता. सदर निविदेनुसार संपुर्ण खरेदी झालेली आहे.तथापी कोरोना रुग्णांची अचानक वाढती संख्या विचारात घेता सदर औषधाची तातडीक मागणीच्या अनुषंगाने 50% पुनर्प्रत्ययी आदेशान्वये 1000 Vials तातडीने खरेदीकामी एकूण र.रु.10,51,680/- इतका खर्च होणार आहे. सदर खर्चास महापालिका अधिनियम कलम ६७(३) (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६८ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/२९७/२०२१, दि.१६/०३/२०२१

विषय - शिंदे वस्ती रावेत येथील रस्त्याचे बीसी पध्दतीने डांबरीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.३१ चा विचार दि.०७/०४/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०६९ विषय क्रमांक – ३२
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/४७७/२०२१, दि.१६/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.२ चिखली बालघरेवस्ती व पवार वस्ती परिसरात ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.

विषय क्र.३२ चा विचार दि.०७/०४/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७० विषय क्रमांक – ३३
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/४८३/२०२१, दि.१७/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/114/2020-21 अन्वये सन २०२०-२१ प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी, यशवंतनगर, उद्यमनगर परिसरातील मनपा शाळा इमारतींची दुरुस्तीची व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.जी.आर.मंगोडेकर नि.र.रू.74,99,932/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख नव्व्यान्नव हजार नऊशे बत्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.74,27,632/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.74,27,632/- पेक्षा 32.10% कमी म्हणजेच र.रु.50,43,362/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.79,998/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.51,95,660/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७१ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – अणुविद्युत व दूरसंचार
सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.दु.सं/आस्था/कावि/१७९/२०२१, दि.१७/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अणुविदयुत व दूरसंचार विभागाचे महसुली अंदाजपत्रकातील सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रकात खालील प्रमाणे वाढ/घट करणे आवश्यक आहे.

| पान क्र. अ.क्र | उपलेखाशिर्षाचे नाव | सन २०२०–२१ तील तरतुद | घट | वाढ | एकुण तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १९४–१९५ अ.क्र ४७ (२२०) ७ | संचार मंत्रालयाची परवाना नुतनीकरण फी अदा करणे. | ३,४२,००० | ० | १००,००० | ४,४२,००० |
| १९२-१९३ अ.क्र ४७ (२२०) ५ | मनपा पदाधिकारी अधिकारी यांचेसाठी सेल्युलर दूरध्वनी सुविधा पुरविणे | २०,००,००० | ० | २,००,००० | २२,००,००० |
| १९२-१९३ अ.क्र ४७ (२१०) ४ | स्थायी आस्थापना | २,५६,५८,००० | | २७,००,००० | २,८३,५८,००० |
| १९४-१९५ अ.क्र ४७ (२२०) ८ | मनपा अधिकारी व अभियंते यांस ब्रॉडबँड सुविधा पुरविणे | ३०,००,००० | ३०,००,००० | | ० |

उपरोक्त प्रमाणे महसुली अंदाजपत्रकातील तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७२ विषय क्रमांक – ३५

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग –विद्युत क क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/११३/२०२१, दि.१७/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रीय विद्युत मुख्य कार्यालय विभागाचे भांडवली अंदाजपत्रकातील सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ/घट कऱणे आवश्यक आहे.

| पान क्र. अ.क्र. | उपलेखाशिर्षाचे नाव | कामाचे नाव | सन २०२०-२१ मधील तरतूद | घट | वाढ | एकूण तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| पान क्र. ३२८ अ.क्र.१५ | सार्वजनिक सुरक्षितता(क क्षेत्रीय कार्यालय) | क क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत मध्यवर्ती भांडार, विविध इमारतीमधे CCTV यंत्रणा बसवणे. (सन२०१९-२०) | १६२००० | ० | ९६४४२०० | ९८०६२०० |
| पान क्र. ३२८ अ.क्र.१६ | सार्वजनिक सुरक्षितता(क क्षेत्रीय कार्यालय) | प्र क्र ९ मध्ये विविध ठिकाणी CCTV यंत्रणा बसवणे. (सन२०१९-२०) | ९८०६२०० | ९६४४२०० | ० | १६२००० |

उपरोक्त प्रमाणे भांडवली अंदाजपत्रकातील तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७३ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/लेखा/कावि/११/२०२१, दि.१८/०३/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (1 ते 8) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७४ विषय क्रमांक – ३७

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/लेखा/कावि/९८/२०२१, दि.११/०३/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (1 ते 12) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९०७५ विषय क्रमांक – ३८

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – विद्युत ग क्षेत्रिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील रत्र क्र.विमुका/५/कावि/१८६/२०२१ दि.२३/०३/२०२१

२) मा.अति.आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षे/थेर/१८३/२०२१, दि.२३/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ग प्रभागांतर्गत कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे करीता विद्युत व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे करीता वाढीव खर्च र.रू.२०,५०,४५५/- (अक्षरी र.रू.वीस लाख पन्नास हजार चारशे पंचावन्न फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७६ विषय क्रमांक – ३९

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – कामगार कल्याण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काक/२/कावि/३६०/२०२१, दि.२३/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रतिबंध उपाय योजनेकामी कार्यरतमनपा अधिकारी/कर्मचारी, मनपाकरीता सेवा देणारे कर्मचारी/कंत्राटी/बाह्यस्त्रोताद्वारे घेतलेले/रोजंदारी/तदर्थ/मानसेवी/मानधनावरील नियुक्त केलेले कामगार यांचे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निधन झाल्यास त्यांचे वारसांना मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.काक/२/कावि/३७४/२०२० दि.०९/०७/२०२० अन्वये पुरविलेल्या विमा सुरक्षा कवच नुसार केंद्र व राज्य शासनाकडून र.रु.५० लाख, शासन निर्णयातील तरतूदीनुसार मनपाकडून अनुकंपा तत्वावर नियुक्ती व र.रु.२५ लाख अर्थसहाय्य तसेच संबंधीत वारस यांनी अनुकंपा नियुक्तीचा विकल्प न स्विकारल्यास त्यांना महापालिकेतर्फे अतिरिक्त र.रु.२५ लाख देय आहे. मनपाकडून द्यावयाच्या अर्थसहाय्य बाबतचा निर्णय समिती मार्फत घेणेकामी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील संबंधीत सर्व अधिका-यांची एकत्रीत समिती मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.काक/४/कावि/३८९/२०२० दि.०६/०८/२०२० अन्वये गठीत करणेत आली आहे. याबाबतचे धोरणास मा.महापालिका सभेने ठराव क्र.५५९ दिनांक २६/०८/२०२० अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार कामगार कल्याण विभागाकडे संबंधीत विभागप्रमुखांच्या शिफारशीसह प्राप्त झालेली खालील प्रमाणे एकूण १३ प्रकरणे तदअनुषंगीक सर्व कागदपत्रांसह समितीपुढे सादर केली होती.

| अ.क्र. | मयत कर्मचारी नाव | मयत कर्मचारी पदनाम | विभाग | वारसाचे नाव | मयत कर्मचा-याशी असलेले नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | कै.श्री.कळबांटे अनंत पांडूरंग | मजूर | अ क्षेत्रिय कार्यालय, विद्युत | श्रीम.कळबांटे अनुजा अनंत | पत्नी |
| २ | कै.श्रीम.भुजबळ शोभा संजय | स्टाफ नर्स | भोसरी रुग्णालय | कु.भुजबळ रुपाली संजय | मुलगी |
| ३ | कै.श्री.जाधव ज्ञानेश्वर रामचंद्र | वॉर्ड बॉय | वाय.सी.एम.एच | श्रीम.जाधव माधुरी ज्ञानेश्वर | पत्नी |
| ४ | कै.श्री.राऊत भालचंद्र गजानन | एम.पी.डब्लू | तालेरा रुग्णालय | श्रीम.राऊत पुजा भालचंद्र | पत्नी |
| ५ | कै.श्री.वाडेकर हनुमंत अंकुश | मजूर | इ क्षेत्रीय कार्यालय, विद्युत | श्रीम.वाडेकर नंदा हनुमंत | पत्नी |
| ६ | कै.श्री.शेख मोहंम्मद नबीलाल | लिफटमन | विद्युत, मुख्य कार्यालस | श्रीम.शेख जाहिदा मोहंम्मद शेख | पत्नी |
| ७ | कै.श्री.शेडगे मारुती सुदाम | मजूर | ह क्षेत्रीय कार्यालय, विद्युत | श्रीम.शेडगे संगिता मारुती | पत्नी |
| ८ | कै.श्री.जगताप सिध्दार्थ गोकुळ | उपलेखापाल | वाय.सी.एम.एच | श्रीम.जगताप अर्चना सिध्दार्थ | पत्नी |
| ९ | कै.श्री.धुमाळ तानाजी रामचंद्र | रखवालदार | सुरक्षा | श्रीम.धुमाळ रंजना तानाजी | पत्नी |
| १० | कै.श्री.पवार संभाजी शिवाजी | शिपाई | माहिती व जनसंपर्क | श्रीम.पवार सुनिता संभाजी | पत्नी |
| ११ | कै.श्री.लाखे साईनाथ चंद्रकांत | कार्या. अधिक्षक | वाय.सी.एम.एच | श्रीम.लाखे राजश्री साईनाथ | पत्नी |
| १२ | कै.श्री.बहिरवाडे तायप्पा राम | रखवालदार | सुरक्षा | श्रीम. बहिरवाडे रमा तायप्पा | पत्नी |
| १३ | कै.श्री.ठाकुर अनिल पांडूरंग | क्लिनर | क क्षेत्रीय कार्यालय, विद्युत | श्रीम.ठाकूर संगिता पांडुरंग | पत्नी |

प्रस्तुत समितीने कागदपत्रांची तपासणी करुन सर्व संबंधीत कर्मचारी यांचे वारसास मंजूर धोरणानुसार कोरोना विषाणू-सुरक्षा कवच योजनेनुसार मनपाकडून प्रत्येकी र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) अदा करणेकामी दिनांक १९/०३/२०२१ रोजीचे बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कोरोना विषाणू संसर्गामूळे निधन झालेल्या वरील तक्त्यातील अ.क्र.१ ते १३ मध्ये नमूद केलेल्या संबंधीत मनपा कर्मचा-यांचे वारसास कोरोना विषाणू - सुरक्षा कवच योजनेनुसार मनपाकडून प्रत्येकी र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) प्रमाणे एकूण र.रु.३,२५,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंचवीस लाख फक्त) अदा करणेबाबत तसेच भविष्यात अशा प्रकारच्या प्रकरणांना कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर समितीच्या मान्यतेने वरील प्रमाणे मंजूर धोरणानुसार लाभ मयत कामगारांचे वारसास देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९०७७ विषय क्रमांक – ४०

दिनांक – २४/०३/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/४२९/२०२१, दि.२३/०३/२०२१

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/४२८/२०२१, दि.२३/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोना विषाणूंच्या संसर्गाला प्रतिबंध घालण्यासाठी महापालिकेकडून आवश्यकती दक्षता घेणेत येत असून त्या अनुषंगाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मनपा मार्फत विविध रुग्णालये, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या संशयित व बाधित रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचेकडून पत्र क्र.मऔभा/३/कवि/६५/२०२१ दिनांक १६/०३/२०२१ व अधिष्ठाता वाय.सी.एम.एच यांचेकडुन पत्र क्रमांक वायसीएमएच औ.भांडार /फार्मा/कावि/४१/२०२१ दिनांक २२/०३/२०२१ अन्वये एकुण 5000 व्हायलस Inj.Remdesivir 100 Mg ची तातडीने आवश्यकता असलेने मागणी प्राप्त झाली आहे. वैदयकीय विभाग व वाय.सी.एम हॉस्पीटलचे मागणी पत्राप्रमाणे सदर औषधे तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यापुर्वी Inj.Remdesivir 100 Mg खरेदी करणेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदा क्र.४२/२०२०-२०२१ अन्वये २००० व्हायल्स खरेदी करण्यात आल्या आहेत. तसेच रुग्णसंख्येत वाढ होत असल्याने पुर्नप्रत्यी आदेशान्वये १००० व्हायल्स तातडीने खरेदी करण्यात आलेल्या आहेत. दरम्यानचे कालावधीत वैदयकीय विभागाकडुन 7050 व्हायलसची मागणी प्राप्त झालेली असल्याने ई निविदा सुचना क्रमांक ५५/2020-2021 प्रसिध्द करण्यात आलेली आहे, सदर निविदेसाठी प्राप्त दर सादर करणेकामी १५ दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे .त्यानुसार सदर निविदे अन्वये खरेदीकामी १५ ते २१ दिवस कालावधी लागणे अपरीहार्य आहे. त्यानुसार तातडीने मनपाचे पुरवठाधारकाना

